आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

# School Leadership Academy, Maharashtra

# मोड्यूल क्र.४७

### झोपडपट्टी क्षेत्रातील शैक्षणिक दृष्ट्या मागास गटातील ( यवतमाळ शहर) मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

### The Role of School Leadership in Retaining Backward Children (Yavatmal Dist.) in the stream of Education in Slum Areas

'भारताचे भवितव्य येथील वर्गखोल्यांमधून घडविले जात आहे' असे कोठारी आयोगाने प्रतिपादन करून उदयोन्मुख भारताच्या सुजाण नागरिक निर्मितीची अपेक्षा शिक्षणातून व्यक्त केली. वर्गखोल्यांमधून दिले जाणारे शिक्षण हे गुणवत्तापूर्ण व जीवनोपयोगी असले पाहिजे यावरही प्रकाश टाकला. गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा एक अत्यंत महत्वपूर्ण घटक विद्यार्थ्यांची उपस्थिती हा आहे. वर्गखोल्यांमधून विद्यार्थीच नसतील तर शिक्षण द्यायचे कुणाला? बालके नियमितपणे शाळेत हजर राहतील तरच शिक्षणाची हमी देता येईल. आज मुले शाळेत न येण्यामागे अनेक कारणे आहेत जसे घरची परिस्थिती, गरिबी, लहान भावंडाचा सांभाळ करणे, अल्पवयात लग्न,मुलांना-मुलींना शाळेत असुरक्षित वाटणे,शाळेत स्वच्छतागृह नसणे, शाळा व घर यामधील मोठा रस्ता ओलांडता न येणे,पावसाळयामध्ये शाळेपर्यंत पोहचू न शकणे, वाहतूक व्यवस्था न परवडणे, शाळेविषयी माहिती नसणे, स्थलांतर इत्यादी. प्रत्येक शाळेमधून मुले शाळाबाह्य होण्याची वेगवेगळी कारणे असू शकतात परंतु शालेय नेतृत्व जर सक्षम असेल आणि नियोजनबद्ध, समर्पण वृत्तीने काम करण्याची जिद्द असेल तर शालेय संस्कृती जोपासणे आणि शालेय समस्या निर्मुलन करणे सहजसाध्य होणारे आहे. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे अण्णाभाऊ साठे नगर परिषद क्र.12 ही शाळा. या शाळेला विद्यार्थी उपस्थिती संदर्भात असणारी आव्हाने आणि त्यासोबतच गरिबी, झोपडपट्टी क्षेत्र, अर्वाच्य भाषा अशी एक ना अनेक समस्या. या सर्व समस्यांना तेवढ्याच सामर्थ्याने आव्हान देऊन विद्यार्थ्यांसाठी नंदनवन फुलवणारी ही शाळा. पर्यवेक्षकीय यंत्रणेचा एक घटक म्हणून जेव्हा या शाळेला भेटी देऊन मुख्याध्यापक,शिक्षक यांचेसोबत संवाद साधल्यानंतर लक्षात आले की शालेय नेतृत्वाला बळकट करणे आणि आणि दिशा देण्याची आवश्यकता आहे. शाळेतील टीमवर्क उत्तमप्रकारचे असून सकारात्मक दृष्टीकोनातून काम करण्याची आवश्यकता आहे. प्रतिकूल परिस्थितीत विद्यर्थ्यांना शाळेत टिकवणे आणि कोरोना काळानंतर शाळेतील विद्यर्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवण्यात या शालेय नेतृत्वाने माघार घेतली नाही. शाळेस दिलेल्या प्रत्येक भेटीतून शाळेतील प्रत्येक घटकांत जिवंतपणा, उत्साह व गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी काही करण्याची तळमळ त्यांच्यामध्ये जाणवत होती. बालकांमधील क्षमता चाचपून त्यांना

यथायोग्य दिशा देण्याचे कसब येथील शालेय नेतृत्वात दिसून आले. वर्गात विद्यार्थी उपस्थित ठेवण्यापासून ते विद्यार्थी जीवनाला गुणवत्तेच अधिष्ठान प्राप्त करून देण्यापर्यंत या शाळेने यशोशिखर काबीज केले आहे. शालेय नेतृत्वाशी सतत संवाद साधणे , दिलेल्या कामाचा पाठपुरावा करत राहणे, शालेय प्रगतीचा आढावा घेत राहणे, विविध उपक्रमात सहभागी होऊन मार्गदर्शन करणे हा शाळेच्या संदर्भात पर्यवेक्षणाचा आलेला एक सुखद शैक्षणिक अनुभव आहे. शालेय नेतृत्व सक्षम करणे,शालेय संस्कृती जोपासणे आणि सक्षम शालेय नेतृवासह काम करत प्रगतीच्या नव्या वाटा शोधत राहणे हेच शिक्षण क्षेत्रातील प्रत्येकाचे कार्य आहे.

The roots of education are bitter, but the fruit is sweet'

देशातील प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात RTE कायदा २००९ आश्वासित करतो. तरीही भारतातील निम्म्याहून अधिक बालके ही शाळाबाह्य होताना दिसून येतात. शिक्षण मानवी संसाधन विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावते. केवळ आर्थिक दृष्टीकोनातूनच नाही तर मानवाच्या वैयक्तिक जीवनाला आकार देण्यापासून ते समाज आणि एकंदरीत राष्ट्र सुसंस्कृत आणि प्रगतीशील ठेवण्यात महत्वपूर्ण भूमिका निभावते. शिक्षणाने समाजाचे आणि राष्ट्राचे बळकटीकरण होते. राष्ट्र निर्मितीत निर्णायक ठरणारी आजची ही बालके विविध समस्यांमुळे शाळाबाह्य होताना दिसून येतात. यातील प्रमुख कारणांपैकी एक कारण म्हणजे झोपडपट्टीतील बालकांच्या शिक्षणाची समस्या. भारतातील झोपडपट्टीत वास्तव्य करणाऱ्या बालकांचे शिक्षण हा नेहमीच शिक्षणव्यवस्थेसाठी आव्हानात्मक विषय ठरला आहे.

भारतीय जनगणना २०११ च्या लोकसंख्येनुसार भारतातील ६३% शहरांमध्ये १३.७ दशलक्ष कुटुंबे ही झोपडपट्टीतील कुटुंबे आहेत. या घरांतील शहरांमध्ये स्थलांतरीतांचा समावेश आहे. त्यापैकी निम्मी कुटुंबे अतिगरीब आहेत. ६ वर्षाखालील आठ दशलक्षाहून अधिक मुले अंदाजे ४९,००० झोपडपट्ट्यामध्ये राहतात. २२.७२ मुले ही ५-१८ या वयोगटातील असून ती शहरी झोपडपट्ट्यामध्ये राहतात व ती मुले शाळाबाह्य आहेत. भारतातील स्थलांतरित लोकसंख्या बहुतेक निरक्षर आहे आणि उपजीविकेच्या संधींच्या शोधात सतत फिरत असते. स्थलांतरित मुले त्यांच्या पालकांसोबत फिरतात आणि अनेकदा वयानुरूप योग्य शैक्षणिक संधी गमावतात. अनेकदा ही बालके गरिबीतून मुक्त होण्यासाठी आणि पालकांना रोजगार कमविण्यात आधार देण्यासाठी श्रम करतात. बालपणापासून काळजी घेणे, संतुलित आहार, शिक्षण, आरोग्य आणि करमणुकीच्या सुविधा मुलांचा सकारात्मक विकास घडवण्याचा राजमार्ग आहे. परंतु ज्याठिकाणी शुद्ध पिण्याचे पाणी आणि दोन वेळेच्या चौरस आहारासाठी संघर्ष आहे तिथे मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि इतर घटकांचा विचार अशक्य वाटतो. शिक्षण हक्क कायदा २००९ नुसार मुलांचे शहरी आणि ग्रामीण भागातील शाळांमध्ये नोंदनीचे प्रमाण वाढेल अशी अपेक्षा असली तरीही एक दशकाहून अधिक काळ लोटला तरीही अनेक मुले शाळाबाह्य आहेत. यातील बहुतेक मुले ही शहरी व ग्रामीण भागातील अतिदुर्गम क्षेत्रातील आहेत. मुलींचे शाळाबाह्य होण्याचे प्रमाण हे (३.२३%) मुलांपेक्षा जास्त (२.७७%) एवढे आहे.

**भारतीय जनगणना २०११ च्या लोकसंख्येनुसार राज्यातील व यवतमाळ शहरातील झोपडपट्टी क्षेत्राबाबत माहिती**

| महाराष्ट्र | झोपडपट्टी वस्तीचे प्रमाण | झोपडपट्टीतील एकूण कुटुंबे | झोपडपट्टीग्रस्त भागातील एकूण लोकसंख्या | पुरुषांची एकूण लोकसंख्या (झोपडपट्टीग्रस्त भागातील) | स्त्रीयांची एकूण लोकसंख्या (झोपडपट्टीग्रस्त भागातील) | 0-6 वयोगटातील बालकांची एकूण संख्या(झोपडपट्टीग्रस्त भागातील) |
|---|---|---|---|---|---|---|
| | १०.५४ % | २,४९९,९४८ | ११,८४८,४२३ | ६,३२८,२१७ | ५,५२०,२०६ | १,४२८,८५० |

| यवतमाळ | झोपडपट्टीग्रस्त भागातील एकूण लोकसंख्या | पुरुषांची एकूण लोकसंख्या (झोपडपट्टीग्रस्त भागातील) | स्त्रीयांची एकूण लोकसंख्या (झोपडपट्टीग्रस्त भागातील) | 0-6 वयोगटातील बालकांची एकूण संख्या(झोपडपट्टीग्रस्त भागातील) |
|---|---|---|---|---|
| | ५०१२० | २५१२२ | २४९९८ | ५४६५ |

युनेस्कोच्या २०१७-१८ च्या सामायिक जागतिक अहवालानुसार २६४ दशलक्ष मुले शाळेत जात नाहीत. जागतिक स्तरावरील झोपडपट्टीग्रस्त समस्येमुळे प्रभावित झालेली ही बालके आहेत.मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते ज्याचा परिणाम येणाऱ्या पिढ्यांवर होतो. जर समाजातील प्रत्येक घटकाने SDG-४ (QUALITY EDUCATION) संपादित करण्यासाठी कटिबद्धता दर्शविली तर आपण एका सामर्थ्यशाली जगाचे साक्षीदार असू असे हा अहवाल सूचित करतो.

यवतमाळ शहरातील झोपडपट्टीत वास्तव्यास असणाऱ्या बालकांमध्ये शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे. या कुटुंबांची आर्थिक परीस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे मुलांना शिक्षण घेण्यात समस्या निर्माण होतात. त्यामुळे काही मुले शिक्षण सोडून उपजीविकेच्या शोधात शाळाबाह्य होत आहेत.लहान वयातच मुलांना बालमजुरी करायला लावणे,गुन्हेगारी कारवाया, कमी वयात विवाह करणे, व्यसनाधीनता हे प्रकार या वसत्यांमधून घडतात त्याहूनही अधिक म्हणजे पालकांना उत्पन्न मिळविण्यास ही बालके मदत करतात. (अनेकवेळा पालकांची उत्पन्न मिळविण्याची साधने ही अवैध व गुन्हेगारी स्वरुपाची असतात.) झोपडपट्टीत आजूबाजूला काम करणाऱ्या लोकांमध्ये चोरी-लुटमार करणाऱ्या, गुन्हेगारी कारवाया करणे, अंमली पदार्थांचा गैरवापर करणाऱ्यांचा समावेश आहे. यामध्ये काही शाळकरी मुले देखील सहभागी असतात. यातील काही पालक जे शाळेच्या संपर्कात येतात ती शालेय पर्यावरणात रमतात, आनंद घेतात. पण जेव्हा पालकांना उपजीविकेसाठी फेरीवर ( गैरमार्गाने अर्थार्जन करणे ) जावे लागते त्यावेळी ते मुलांना सोबत घेऊन जातात. अशावेळी ही मुले शाळाबाह्य होतात. यातील बहुतेक मुले ही खूप हुशार असतात आणि त्यांना अभ्यास करून कुटुंबाचे नशीब बदलण्याची इच्छा असते.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे :-**

१) झोपडपट्टी क्षेत्रातील विद्यार्थ्यांची कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थिती समजून घेणे.
२) शाळा संस्कृती समजून घेऊन ती रुजवण्यासाठी प्रयत्न करणे.
३) झोपडपट्टी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा संस्कृतीची जोपासना करून शालेय नेतृत्वामार्फत प्राप्त यशाचा अभ्यास करणे.
४) झोपडपट्टी क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या समाजघटकांमध्ये शालेय नेतृत्व विकासासाठीचा दृष्टीकोन व प्रेरणा निर्माण करणे.

झोपडपट्टी क्षेत्रातील शैक्षणिक दृष्ट्या मागास गटातील ( यवतमाळ शहर) मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यात शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने

**विद्यार्थ्यांच्या बाबतीत येणारी आव्हाने :**

१. बहुतेक विद्यार्थी हे झोपडपट्टीग्रस्त भागातील असल्यामुळे त्यांच्यासमोर दैनंदिन उपजीविकेचा प्रश्न असतो.
२. ही मुले भावनाप्रधान असतात त्यामुळे क्षुल्लक कारणावरून हिंसक वर्तन करतात. भांडखोर व खोडकर प्रवृत्ती असल्याचे निदर्शनास येते.
३. राहणीमान अस्वच्छ व घाणेरडे असते. दैनंदिन वापरासाठी पुरेसे कपडे या मुलांकडे नसतात. स्वच्छतेच्या व नीटनेटकेपणाच्या सवयींचा अभाव असतो.
४. संवाद कौशल्याचा अभाव असतो. भाषा आक्रमक व शिवीगाळ युक्त असते.
५. मुले झोपडपट्टीग्रस्त भागातील असल्यामुळे त्यांची भाषा गुन्हेगारी स्वरुपाची असून, हिंसक वर्तन व  प्रवृत्ती भांडखोर असून ही मुले पालकांसोबत फेरीवर जात असल्याने सतत गैरहजर राहतात व शाळाबाह्य होतात.

**पालकांशी संबधित आव्हाने :**

१. पालक अतीनिम्न आर्थिक स्तरातून असल्याने उपजीविकेच्या शोधात असतात त्यामुळे ते पालकसभा, SMC सभेस अनुपस्थितीत असतात.
२. पालक मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत अनभिज्ञ असतात. शाळेतील शिस्त, नियम तसेच शैक्षणिक बाबींसाठी शाळेला सहकार्य करणे याबाबतची जागरूकता पालकांमध्ये नसते.
३. बहुतेक पालक हे व्यसनाधीन असतात, हिंसक व भांडखोर प्रवृत्तीचे असल्याने शैक्षणिक बाबतीत जाणीव जागृती करणे एक आव्हान आहे.
४. पालक उपजीविकेच्या शोधात सतत फिरतीवर असल्यामुळे पाल्याच्या शैक्षणिक प्रगती बाबतचे गांभीर्य पालकांमध्ये नसते.
५. काही पालक शाळांकडे सरकारी शाळा म्हणून पाहतात त्यांच्यामध्ये आपलेपणाची व शैक्षणिक व्यवस्थेविषयी आदराची भावना दिसून येत नाही.

**शिक्षकांसंबधी आव्हाने :**

१. विद्यार्थी सतत गैरहजर असल्यामुळे शाळाबाह्य विद्यार्थी संख्या वाढते.त्यातील काही विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता प्राप्त नसल्यामुळे ते एकदा शाळाबाह्य झाले की पुन्हा शिक्षण प्रवाहात येत नाहीत.
२. विद्यार्थ्यांच्या सतत गैरहजर असण्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे द्यावे ही मोठी समस्या शिक्षकांना जाणवते.
३. विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या सवयी लावणे, गुन्हेगारी वर्तनापासून दूर ठेवणे, हिंसक, आक्रमक व भांडखोर प्रवृत्ती कमी करणे व सतत शाळेत उपस्थित ठेवण्यासाठी विविध प्रयत्न करणे हे शालेय नेतृत्वासमोरील आव्हान आहे.
४. काही विद्यार्थी दुर्गम भागातील झोपडपट्टीत राहत असल्याने असे विद्यार्थी गैरहजर राहू नये व शाळेतील विद्यार्थी संख्या कमी होऊ नये याकरिता वाहतूक व्यवस्था उपलब्ध करावी लागते.
५. शाळेत क्षुल्लक कारणावरून विद्यार्थ्यांचे भांडण झाले असता पालक शालेय वातावरणात हस्तक्षेप करतात.

**सामाजिक आव्हाने :**

१. समाजाचा व पालकांचा सरकारी शाळांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलणे. शाळेसंदर्भात असणारे पूर्वग्रह दूर करून शाळेविषयी सहकार्याची,आदराची व आत्मीयतेची भावना विकसित करणे.
२. सदरची शाळा झोपडपट्टी लगतच्या क्षेत्रात येत असल्याने व शाळेत सर्वाधिक मुले ही झोपडपट्टीतील असल्याने गुणवत्तेच्या बाबतीत जनसामान्यांमध्ये योग्य प्रतिमा निर्माण करणे.
३. या क्षेत्रातील लोक सतत स्थलांतर करत असतात त्यासोबतच बालके शाळाबाह्य होतात अशा बालकांची तात्पुरत्या स्वरुपात राहण्याची व्यवस्था करणे व मुलांशी संबधित अनेक समस्या याबाबत समाजामध्ये जाणीव जागृती करणे हे एक आव्हान आहे.

## यशोगाथा

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

## न.प.डिजिटल शाळा क्र.12, यवतमाळ

**श्री.अरुण धाये**

रिना मेश्राम, गुंजन खिची,सलमा अनिस महावत, अश्मितसिंग अर्जुनसिंग टाक (इयत्ता ५ वी व ६ वी चे विद्यार्थी) या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला तर रिना मेश्राम ही २०२३ च्या जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धेची प्रथम क्रमांकाची विजेती ठरली. करण आमटे, शुभम सुरोशे, अथर्व गवई, रिना मेश्राम, गुंजन खिची,सलमा अनिस महावत,अश्मितसिंग अर्जुनसिंग टाक (२००६-७) यांची राष्ट्रीय खो-खो संघात निवड झाली आहे. जिल्हास्तरावर शाळेला व शाळेतील विद्यार्थ्यांना अनेक बक्षिसे प्राप्त झाली आहेत. शाळेच्या राजभाषा संवर्धन मोहीम या विषयावर आधारित पथसंचलनास जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक तर कला व क्रीडा स्पर्धेत विद्यार्थी डिप्रेशनवर आधारित नृत्याला जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. वीर नाडे हा इयत्ता ६ वीचा विद्यार्थी उत्तम कविता करतो. लकी परमेश्वर गवळी या विद्यार्थ्याची (इ.९ वी ) राष्ट्रीय खो-खो संघात निवड झाली.(२००९). शाळेतील अनेक विद्यार्थी सद्यस्थितीत वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया भूमिकेत छान

काम करत आहेत. गुन्हेगारी आणि गरिबीच्या विळख्यात सापडलेली ही मुले आज आपल्या कुटुंबाचा आधार बनली आहेत.

श्री.अरुण धाये, मुख्याध्यापक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे न.प.डिजिटल शाळा क्र.12, यवतमाळ, जिल्हा यवतमाळ हे आपल्या आजी-माजी विद्यार्थ्याविषयी अभिमानाने सांगतात. श्री.अरुण धाये शैक्षणिक वर्षे २००६ -७ पासून आपल्या सहकाऱ्यांसोबत झोपडपट्टी व दुर्गम वस्तीतील बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अथकपणे काम करत आहेत.



अतिगरीब, गरजू, वंचित, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या,एकल पालकत्व असलेल्या, दुर्बल आणि मागास गटातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून मुलांमध्ये शिक्षणाप्रती सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणारी प्रणाली 'म्हणजे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, न.प.डिजिटल शाळा क्र.12, यवतमाळ' मुख्याध्यापक श्री.अरुण धाये आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अविरतपणे केलेले कार्य आज दृश्यमान स्वरुपात आपणासमोर आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, न.प.डिजिटल शाळा क्र.12, यवतमाळ' ही यवतमाळ शहरातील वडगाव रोड वरील झोपडपट्टी भाग : नेताजी नगर, आंबा नगर वस्ती नजीक आहे. वाहतुकीच्या दृष्टीकोनातून अगदी मुख्य रस्त्यावर ही शाळा आहे. हा परिसर शहरी भागात असून आजूबाजूला भरगच्च वस्ती आहे. या क्षेत्रात शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे. अशा प्रतिकूल क्षेत्रात शिक्षणाचा वसा घेणारे श्री.अरुण धाये कार्य करत आहेत. शाळेच्या अगदी सुरुवातीपासूनच शिक्षणाचा, आरोग्याचा, भौतिक सोयी-सुविधांचा अभाव असे अनेक प्रश्न आव्हान म्हणून उभे होते. शाळेत मुलांची नोंदणी तर व्हायची पण शाळेत मुले यायचीच नाही आणि आली तर एक-दोन दिवस राहायची आणि परत शाळाबाह्य व्हायची. शिक्षकांना मात्र शिकवावे कसे हाच यक्ष प्रश्न असायचा. गुणवत्तेचा प्रश्न तर दूरच राहिला. अशा प्रतिकूल परिस्थितीही नाउमेद न होता शिक्षकांनी आपले प्रयत्न सुरु ठेवले आणि आज रोजी शाळेची पटसंख्या १५६ आहे. शाळेची मागील पाच वर्षातील पटसंख्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | पटसंख्या (१ ते ८) |
|---|---|---|
| १. | २०१८-१९ | १४९ |
| २. | २०१९-२०२० | १३८ |
| ३. | २०२०-२०२१ | १४६ |
| ४. | २०२१-२०२२ | १५९ |
| ५. | २०२२-२०२३ | १५६ |

नगर परिषद शाळेसाठीची ही जडण-घडण वाटते तेवढी सोपी नव्हती. यशाचा या प्रवासात शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, सहकारी, समाज सर्वच घटक सहभागी आहेत.मुलांना हिंसक, भांडखोर प्रवृत्तीपासून परावृत्त करणे. पालकांना शिक्षणाशी जोडून ठेवणे, त्यांचे मत परिवर्तन करणे यामध्ये यश मिळविले. वर्गामध्ये उत्साहपूर्ण शैक्षणिक वातावरण निर्माण करणे, सण-समारंभ साजरे करणे त्यासोबतच विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे यासाठी शाळा सज्ज असते.

**परिपाठात आणापानाची आवश्यकता अधोरेखित केली : (https://youtu.be/pGFTtW6lhwo)**

बहुतेक शाळकरी मुले ही झोपडपट्टीग्रस्त भागातील असून आक्रमक, हिंसक, भांडखोर, खोडकर व गुन्हेगारी पार्श्वभूमी घेऊन आलेली आहेत. अशा मुलांना शांतपणे शिक्षण घेता यावे याकरीता शाळेनी परिपाठात १० मिनिटाचे आणापान बंधनकारक केले. सदर उपक्रमाचा लाभ  बरीच मुले शांत होण्यात झाला. त्यांची हिंसक प्रवृत्ती सौम्य झाली. मुले आता आनंदाने हसू-बागडू लागली. मुलांच्या भाषेत सुधारणा झाली. एकेकाळी शिक्षकांना दम देणारी मुले आता शिक्षकांशी प्रेमाने, आदराने संवाद साधतात.

**संगीतमय पाढ्यांनी घातली बालमनाला साद :**

संगीतमय पाढे विथ अँक्शन या उपक्रमाने मुलांचे पाढे मनोरंजक करून मुले आनंदाने आणि उत्साहाने पाढे पाठ करू लागले. या उपक्रमाचा लाभ मुलांचे पायाभूत संख्याज्ञान प्राप्त करण्यात होत आहे. 'गणितोत्सव' कार्यक्रमांतर्गत गणितीय प्रश्नमंजुषा,गमतीदार कोडी,कूटप्रश्न, रामानुजन चौरस अशा भरगच्च नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात येते.

**गुणवत्तापूर्ण शिक्षण : (https://youtu.be/pGFTtW6lhwo)**


शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी कटीबद्ध आहे. त्यासाठी विवीध नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन शाळेमार्फत केले जाते. ही शाळा डिजिटल आहे त्यामुळे डिजिटल वर्ग, पोस्टर निर्मिती,चित्रकला स्पर्धा,वैज्ञानिक रांगोळी,विज्ञान प्रश्न-मंजुषा, चला जाऊया भांड्याच्या दुनियेत, रीडिंग मॅरेथॉन संगीतमय पाढे, आणापान असे वैविध्यपूर्ण उपक्रम गुणवत्तापूर्ण शिक्षणात महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.














**क्षेत्रभेटीतून/सहलीतून शाळेने दिला विद्यार्थ्यांना मोकळा श्वास :**

विद्यार्थ्यांना जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा. अनुभवातून शिकता यावे यासाठी कृतियुक्त शिक्षण तर शाळेमार्फत दिले जाते त्यासोबतच विविध ठिकाणी क्षेत्रभेटी/सहलीचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांची आर्थिक कुवत कधी-कधी आयोजन करण्यात अडसर निर्माण करते परंतू शाळेतील शिक्षकांनी नकळत बालकांचे पालकत्व स्वीकारले आहे. विद्यार्थ्यांना केवळ आर्थिक पाठबळ नसल्यामुळे सहलीचा आनंद उपभोगता येऊ नये असे शाळेत घडत नाही.



**डिजिटल साहित्याद्वारे शिक्षणावर भर :**

शाळेतील विद्यार्थ्यांचे कोरोना काळात डीजिटल साहित्याद्वारे शिक्षण सुरु ठेवण्यात आले त्यासोबतच नियमितपणे डिजिटल माध्यमातून शिक्षण देण्याकडे शाळेचा भर आहे. संगीतमय पाढे, 'संगणकासोबत एक तास', असे विविध उपक्रम डिजीटल माध्यमातून शाळेमार्फत राबविले जातात.




**विद्यार्थी रमले पुस्तकांच्या दुनियेत – (https://youtube.com/watch?v=tPTjpo1poDg&feature=share)**

शाळेच्या आवारातच भव्य आणि सुसज्ज असे ई-वाचनालय आहे. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी. त्यांच्यातील भांडखोर प्रवृत्ती नष्ट व्हावी. विद्यार्थी जास्तीत जास्त वेळ विविध उपक्रमात गुंतून कसे राहतील यासाठी विद्यर्थ्यांना वाचनाची सवय शालेय नेतृत्वाने लावली. विद्यार्थी आपल्या आवडीने त्यांना हवी ती पुस्तके वाचतात.त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे दर्जेदार व वाचनीय साहित्य त्यांना उपलब्ध होत नाही.शाळेमार्फत विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून दिली जातात व मुले ती आनंदाने वाचतात.



**क्रीडा क्षेत्राने निर्माण केली शाळेची ओळख :**

शाळेने राज्यस्तर ते राष्ट्रीय स्तर असे नावलौकिक मिळविणारे खेळाडू निर्माण केले. विद्यार्थी उर्जेला क्रीडेची जोड देऊन विद्यार्थ्यांच्या भविष्याला दिशा देण्याचे काम शाळा करत आहे. शाळेतील शिक्षक स्वतः विद्यार्थ्यांनी रोज मैदानावर सराव केला पाहिजे यासाठी सातत्याने प्रयत्न करतात. ज्या झोपडपट्टी क्षेत्रातून हे विद्यार्थी येतात तेथे मुलींनी मैदानावर खेळाडूच्या कपड्यात धावावे ही कल्पनाच अवघड होती. परंतु शाळेतील शिक्षकांवर पालकांनी विश्वास दर्शविला आणि सलाम अनिस महावत, रिना मेश्राम यांच्यासारख्या विद्यार्थिनी खेळामध्ये नावलौकिक मिळवत आहेत. शाळेत रनिंग, योगा, बॅडमिंटन, बुद्धीबळ, मल्लखांब अशा विविध खेळाचा विद्यार्थी आनंद घेत आहेत.

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे न.प.डिजिटल शाळा क्र.12, यवतमाळ, मार्फत राष्ट्रीय स्तरावर खो-खो संघात निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी**

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | वर्ष |
|---|---|---|
| १. | कु.गुंजन अर्जुन खिची | २०२०-२१ |
| २. | कु.रिना दिलीप मेश्राम | २०१९-२० |
| ३. | करण सुधाकर आमटे | २०१८-१९ |
| ४. | शुभम सुरोशे | २०१७-१८ |
| ५. | अथर्व परमेश्वर गवई | २०१९-२० |
| ६. | लकी परमेश्वर गवई | २०२२-२३ |




JNKKC 397

KHO KHO FEDERATION OF INDIA
(Regd. No. S.3036-66-67)
Recognised by Ministry of Youth Affairs & Sports, Govt. of India
Affiliated to International Kho Kho Federation, Asian Kho Kho Federation & Indian Olympic Association

39TH JUNIOR NATIONAL KHO KHO CHAMPIONSHIP 2019-20
(BOYS & GIRLS)
From 19th to 23rd October 2019

Participation Certificate

Awarded to GUNJAN KHICHI
Father's Name ARJUN S.KHICHI
Date of Birth 05.06.2004 Representing VIDARBHA

State / Region as PLAYER in the 39th Junior National Kho Kho Championship 2019-20 for Boys & Girls held from 19th to 23rd October 2019 at SMC School No. 8/9, B/H Gandhi ITI College, Surat, Gujarat organised by Gujarat State Kho Kho Association under the aegis of Kho Kho Federation of India.

Sudhanshu Mittal, President
M. S. Tyagi, General Secretary
Maheshbha Patel, President
Girish V. Sule, General Secretary

**चिंतनात्मक प्रश्न :-**

१) झोपडपट्टी क्षेत्रातील विद्यर्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांच्यामध्ये शिक्षणाप्रती सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी शालेय नेतृत्वापुढे कोणती आव्हाने होती?

२) प्रस्तुत शालेय नेतृत्वाला गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आणखी काय करता आले असता त्याबाबत आपले मत नोंदवा.

**विचार करूया :-**

तुम्ही एका झोपडपट्टी क्षेत्रातील शाळेचे मुख्याध्यापक आहात. तुमच्या शाळेत बालकांनी गैरहजर राहू नये व पायाभूत साक्षरता प्राप्त व्हाव्यात यासाठी काय करता येईल.

**झोपडपट्टीग्रस्त क्षेत्रातील विद्यर्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व शालेय गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या विकासासाठी असेही करता येईल:-**

१) पालक आणि विद्यर्थ्यासाठी मार्गदर्शन व समुपदेशन मेळाव्यांचे/सभांचे आयोजन करणे.

२) माजी विद्यार्थ्यांच्या मदतीने यशस्वी विद्यार्थी अनुभव कथन,मेळावे,सभा तसेच विविध उपक्रमांचे आयोजन करणे .

३) विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वास,प्रेम व जिव्हाळयाचे संबध निर्माण करून शालेय उपस्थिती,सहभाग वाढविणे

४) शाळा संस्कृती निर्माण करण्यासाठी प्रशासक,शिक्षक-पालक,विद्यार्थी,समाज यांच्यामध्ये परस्पर विश्वास व आपुलकीचे संबध निर्माण करणे.

५) शाळा संस्कृतीस हानिकारक ठरणाऱ्या घटकांची यादी तयार करून त्यावर तात्काळ उपाय योजना सुचविणे.

**प्रस्तुत मोड्यूलची शालेय नेतृत्वासह शिक्षकांच्या दृष्टीकोनातून उपयुक्तता :-**

१) झोपडपट्टी क्षेत्रातील बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण घेता यावे याकरिता शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवणे आवश्यक आहे.
२) झोपडपट्टी क्षेत्रातील बालकांचे शाळाबाह्य होण्याचे प्रमाण अत्यल्प होईल.
३) सकारात्मक शाळा संस्कृती निर्माण झाल्यास उदयोन्मुख समाजाची भविष्यात निर्मिती होईल.
४) शिक्षण हा यशाकडे नेणारा राजमार्ग आहे याची जाणीव विद्यार्थी,समाज व पालकांना होईल.
५) झोपद्पट्टी भागातील विद्यार्थ्यांच्या समस्या,अडचणी समजून घेऊन त्यांचे निराकरण करण्यात शिक्षक आणि मुख्याध्यापक यशस्वी होतील.

**समारोप –**

बालकांच्या शिक्षणासाठी शासन स्तरावरून व्यापक प्रयत्न होत असताना देखील बालक शाळाबाह्य होण्याचे प्रमाण वाढले आहे. शालेय नेतृत्व विविध समस्यांना सामोरे जात असते. या समस्या निराकरणासाठी शालेय नेतृत्व समर्थ हवे. नगरपरिषद शाळेतील शालेय नेतृत्व विकासाने हे आव्हान समर्थपणे स्वीकारले आणि यशाची कास धरली. शालेय संस्कृती निर्माण करणे, रुजविणे आणि ती सतत कायम पल्लवित ठेवण्यात शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक,कर्मचारी यांची मोलाची कामगिरी आहे.

सदर शालेय नेतृत्वामार्फत गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी जे प्रयत्न करण्यात आले आहेत त्यातून प्रेरणा घेऊन इतर शाळानाही गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे ध्येय नक्कीच साध्य करता येईल असे वाटते.

**संदर्भ साहित्य –**


१. शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम,पूरक वाचन साहित्य,महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद
२. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९
३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०
४. www.miepa.ac.in
५. www.ncert.nic.in
६. www.niepa.ac.in
७ जनगणना २०११
८. https://mr.vikaspedia.in/health



| मोड्यूल विकसक | समन्वयन | मार्गदर्शक |
| --- | --- | --- |
| श्रीम.किरण रापतवार | डॉ.ज्योती कुलकर्णी | श्री.रमाकांत काठमोरे |
| अधिव्याख्याता | समन्वयक | संचालक |
| जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, यवतमाळ | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |